# राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या साहित्यातून प्रकटणारा विज्ञानवादी दृष्टिकोण

**अ. अ. नांदगांवकर**
मराठी विभाग
स्वा. से. श्री. क. रा. इन्नाणी महाविद्यालय, कारंजा (लाड) जि. वाशिम
profanup1@rediffmail.com

## सारांश

*राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी मांडलेले विचार अत्यंत प्रगल्भ व जनजीवननिष्ठ असून ते विश्वव्यापी स्वरूपाचे आहेत. गद्य, पद्य आदि बहुविध वाङ्मयाची निर्मिती करताना त्यांची भूमिका विवेकनिष्ठ, विज्ञानवादी असून त्यातील जिवंतपणामुळे ते जनसामान्यांनाच नव्हे तर विद्वान विचारवंतांना सुद्धा प्रेरणादायी ठरतात. त्यांच्या एकंदर साहित्यातून तसेच प्रत्यक्ष प्रबोधनातून त्यांची विज्ञाननिष्ठ दृष्टी स्पष्ट होते. त्यांच्या विचारविश्वाची तार जनांच्या जगण्याशी सहज जुळत असल्यामुळे आपण त्याला लोकविज्ञानदृष्टी म्हणू शकतो. प्राचीन षीमुनींनी समाजाच्या बाल्यावस्थेत जनजीवनाचे नियंत्रण विज्ञानदृष्टीने केले होते. परंतु पुढील काळात ही विज्ञानदृष्टी विसरली गेली व तिला परंपरा व रूढीची अवकळा आली. आजमितीस जनजीवनात परंपरेने चालत आलेल्या समजुतींमागची लोकविज्ञान दृष्टी (लोकायतिक) आपण हरवून बसलो आहोत.*

*आजचे विज्ञान हे मानव जातीच्या विकासाकरिता सृष्टशक्तींचे नियमन करण्यावर आधारलेले आहे. त्यामागील हेतू उदात्त आहे, परंतु काही निवडक सामर्थ्यसंपन्न समाजघटक यांनी अत्याधुनिक विज्ञानावर कब्जा करून स्वार्थाकरिता विज्ञानाचा गैरवापर सुरू केल्यामुळे जनसामान्यांच्या विकासाकरिता नव्हे, तर शोषणाकरिता विज्ञान वापरले जाण्याचा धोका निर्माण झाला आहे. माणसाचे माणूसपण हिरावले जाऊन मानव जीवनाचा बहुमूल्य भाग निरर्थकतेच्या जंजाळात गुंतू लागला आहे. काही जनविरोधी शक्ती वर्चस्वासाठी इतरांवर अनिष्ट प्रहार करीत आहेत. अशा स्फोटक सद्यःस्थितीत राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी जो अध्यात्मनिष्ठ विज्ञानवाद अंगीकारला व मनाप्राणापासून जनांमध्ये प्रसारित केला तो अतिशय महत्वाचा ठरतो. शिवाय हा दृष्टिकोण पूर्णतः देशीय तत्त्वज्ञानाशी निगडीत असून त्याला प्राचीन भारतातील लोकायतिक तत्त्वज्ञ, बुध्दमहावीरासारखे क्रांतिकारी महात्मे, मध्ययुगीन भारतीय संत व आधुनिक समाजसुधारक यांचा भक्कम आधार लाभलेला आहे.*

***मुख्य शब्द:*** *राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, विज्ञानवादी दृष्टिकोण, इहवाद, कर्मकांड, संत, राष्ट्र, जन, बुद्धिप्रामाण्य परिवर्तन*

## प्रस्तावना

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी आपल्या जीवनामध्ये विविध साहित्यप्रकार हाताळले आहेत. राष्ट्रसंतांनी मांडलेले बहुअंगी विचार जीवनाच्या सर्वच पैलुंना स्पर्श करीत असल्याचे आपल्या निदर्शनास येईल. आज जीवनात सवत्र विज्ञानाचे महत्त्व वाढलेले असूनही या विषयाच्या वाटेला चांगले चांगले विचारवंतही जाताना दिसत नाहीत. याचे कारण म्हणजे विज्ञानाची, त्यातील पारिभाषिक संज्ञांची, व्याख्यांची वाटणारी भिती हे होय. परंतु राष्ट्रसंत अगदी सहजतेने विज्ञाननिष्ठ दृष्टीतून विषयाची मांडणी करताना दिसतात. जीवनामध्ये विज्ञान कसे एकजीव झाले आहे हे राष्ट्रसंत जीवनाच्या एकेका पैलूतून दर्शवून देतात आणि म्हणूनच राष्ट्रसंतांच्या विज्ञाननिष्ठ विचारांचा शोध घेण्याचा व ते प्रकट करण्याचा प्रस्तुत लेखकाचा प्रयत्न आहे. मात्र हा शोध घेताना सर्वप्रथम विज्ञान म्हणजे नेमके काय, हे जाणून घेणे आवश्यक आहे.

### विज्ञानाच्या व्याख्या

1) ‘भटभिक्षुकांचे ज्ञान म्हणजे विज्ञान नव्हे, तर आकाशाचे अणुरेणुतत्व म्हणजे विज्ञान’ ..............................म.जोतीबा फुले.

2) ‘जिज्ञासा, प्रयोग, निरीक्षण, कारणमीमांसा, भाकित या पाच कड्यांच्या साखळीतून चालणारी वाटचाल म्हणजे विज्ञान’ ..............................डॉ. जयंत नारळीकर

3) ‘एका विशिष्ट पद्धतीने विकसित केलेल्या विचारप्रणालीचा मानवी जीवनाच्या सर्वांगीण समृद्धीसाठी उपयोग करणे म्हणजे विज्ञान होय.’ ..............................डॉ. अरविंद पारसनीस

4) 'भौतिक विश्वाचे व्यवस्थाबद्ध ज्ञान म्हणजे विज्ञान होय. हेच सामाजिक, राजकीय, आर्थिक, मानसिक विषयांचे सुव्यवस्थापन होय. '............................. डॉ. सुभाष सावरकर

असा अनेक विचारवंतांनी आपापल्या परीने विज्ञानाचा निव्वळ ज्ञानात्मक परामर्श घेण्याचा प्रयत्न केलेला दिसून येतो. विज्ञान व मानवी जीवन यांची सांगड घालण्याचा प्रयत्न यात फक्त म. फुले सारखे किंवा गाडगे महाराजांसारखे रॅशनल विचारवंत किंवा राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांसारखे विवेकनिष्ठ विचारवंत करताना दिसतात. यामध्ये आपणास दिसून येतो तो जनसामान्यांना धरून चालणारा दुवा. राष्ट्रसंत तुकडोजी आपल्या व्याख्येमध्ये काय म्हणतात ते आपण बघू. 1947 साली 'योगविद्या' हे देखील एक विज्ञान आहे हे सांगताना एका भक्ताच्या शंकासमाधानाच्या वेळी म्हणाले – अरे या जगातली उत्पत्ती सूर्यावर आधारली आहे. आपल्या देशात सूर्यविज्ञान आहे. ......... त्या योग्याला हे ज्ञान असावं की कोणत्या वस्तूत कोणत्या किरणांचा योग केल्याने कोणती वीज निर्माण होते. या भूमिकेचा विचार केला तर त्यांच्या विचाराची देशीयता आपल्या लक्षात येते. या उपरोक्त व्याख्यांच्या आधाराने आपण विज्ञानाचा विचार करायचे ठरवले तर विज्ञानविद्येची काही लक्षणे आपल्या लक्षात येतात. त्यांचेशी राष्ट्रसंतांच्या वैचारिकतेची सांगड आपण घालणार आहोत. यात महत्त्वाची पाच लक्षणे येतात. इहवाद, कर्मकांडाचा निषेध, बुद्धिप्रामाण्य, आत्ममंथन व मर्यादांची जाणीव आणि अखंड परिवर्तनशीलता.

उपरोक्त पाच मुद्यांचा विचार येथून पुढे मांडायचा आहे.

## 1) इहवाद

इहवाद म्हणजे विश्वसत्यवाद होय. निसर्गाचे अनादित्व गृहीत धरून इहवाद हा मानवी जीवनाची समृद्धी अपेक्षितो.

राष्ट्रसंतांनी इहवादाचा पुरस्कार केलेला आहे, याचे प्रमाण ते आपल्या साहित्यामध्ये अनेक ठिकाणी देताना दिसतात. मात्र त्यातल्यात्यात त्यांनी जी सायंप्रार्थना सांगितली आहे, त्यात याचे उदाहरण दिसून येते. 'है प्रार्थना गुरुदेवसे' असे म्हणून ते प्रार्थनेची सुरुवात करतात. यात ते विश्वव्यापी चैतन्यास आळवतात. यातच तर विश्वसत्यवाद दिसून येतो. ते आपल्या भजनातूनही हेच सांगतात,–

**'आओ कोई भी धर्मी, आओ कोई भी पंथी**
**देशी–विदेशियोंका, मंदिर यह हमारा**
**सबके लिए खुला है, मंदिर यह हमारा ।।'**

हा खऱ्या अर्थाने धर्मनिरपेक्ष विश्वसत्यवाद होय. याकरिता ते पुढे सांगतात, 'ब्रम्हरूप तर सर्वच आहे. तेव्हा ब्रम्ह होण्यासाठी प्रयत्न करण्याची गरजच नाही. गरज आहे प्रकृतीत इष्ट सुधारणा घडवून आणण्याची.' या ठिकाणी राष्ट्रसंत विस्तृत विश्वसत्यवादाचा पुरस्कार करताना दिसतात. या विश्वद्रव्यात प्रयत्नाने फेरबदल करता येऊ शकतो असेही ते मानतात.

आज आपण विविध धर्म, पंथ, पक्षात बांधले गेलेले आहो. परंतु आपण जर ही सर्व तत्त्वे एक आहेत वा परस्परपूरक आहेत हे समजून घेतले तर आपला विकास व्हायला वेळ लागणार नाही. इहवाद हा विज्ञानाच्या इतर सर्व बाबींचा मूळ पाया असून त्यावरच विज्ञानाचा सर्व डोलारा उभा आहे.

## 2) कर्मकांड निषेध

परंपरा, रूढी व पूर्वसुरींच्या पद्धती किंवा प्रक्रिया आंधळेपणाने अनुसरणे यांना कर्मकांड म्हणतात. कर्मकांडाला विज्ञानात निर्णायक स्थान कधीच नसते.

आज भारतामध्ये रूढी, परंपरा पूर्वसुरींच्या पद्धतीप्रक्रियांचे स्तोम माजलेले आहे. अशा स्थितीत राष्ट्रसंत या सर्वांतून सत्य काय ते शोधण्याचे आवाहन जनसामान्यांना करतात. त्यांनी केलेले कार्य हे आधुनिकतेचे स्वागत करणारे कार्य आहे. तीर्थावर देव आहे म्हणणाऱ्यांना ते सांगतात,'घोटाळे केले ते तेथील लोकांनी केले. तीर्थांनी नव्हे' आज पाखंडी वेश परिधान करणारे सर्वत्र आपल्याला सापडतात. मात्र आपली मनःशांती सत्यात दडलेली आहे. कर्म करायचे तर म. गांधींसारखे कार्य करा, हा सल्लाही ते आपणास देताना दिसून येतात.

'तीर्थे ही भारतीय संस्कृतीची विद्यापीठे होती. त्या उच्चस्थानावरून जीवनाचे पवित्र झरे आमच्या देशातील गावागावांत पसरत होते. यात्रेच्या निमित्ताने देशाचे दर्शन आणि आपत्तींना तोंड देण्याचे सामर्थ्य लोकांना प्राप्त होत होते.' एकत्वाची भावना रुजत होती. पण मग ही भावना क्रियाकर्मकांडात लोप पावली व देश रसातळास जाऊ लागला. पुढे ते सांगतात, 'रूढिवाद

बळावला व पंडेगिरीने व्यापार सुरू केला.' समाजास लुटणारे समोर येत गेले. भोगलालसेने समाज अंध बनला. खरे हिंदुत्त्व किंवा कर्मकांडाचा निषेध म्हणजे काय हे सांगताना ते म्हणतात.

**'हिंदुत्त्व नही है वेषभूषा, रंग है ना जात है,।'**
**ना पक्ष है, ना भक्ष है, ना और कोई बात है ।।**
**जो स्वप्रकाशी सत्य है, वहि, नित्य है, निजतत्त्व है ।**
**जिसपर खडा यह विश्व है । सच्चा वही हिंदुत्त्व है ।'**

वरील ओळींमधून राष्ट्रसंत सुद्धा कर्मकांडाचा निषेध करताना दिसून येतात.

रूढी–दास्य त्यांना सुद्धा अमान्य होते आणि म्हणूनच ते 'आजचा संदेश' देताना म्हणतात,'आजचा काळ देवळे बांधण्याचा किंवा चार धामांची यात्रा करण्याचा नाही. हा काळ श्रमदानाचा, स्वावलंबन आणि सेवा शिकण्याचा आहे, यज्ञात तुपाची धार न सोडता, भुकेने तळमळणाऱ्या शेकडो लोकांच्या पोटाची आग विझवून त्यांना माणूस म्हणून जगविण्याचा आहे.'

वरील संदेशाच्या माध्यमातून राष्ट्रसंत आपल्याला एक अलौकिक दृष्टी देतात.

**'मनी नाही भाव म्हणे देवा मला पाव'**

या भजनाच्या माध्यमातून ते सांगतात की वेशभूषेने साधू किंवा भक्त होत नाही. त्याला आतूनच विश्वचैतन्याची बांधिलकी असावी लागते. विश्वव्यापी चैतन्यतत्त्वाची भक्ती ही दुसरी तिसरी काही नसून विश्वाच्या विटेवर उभ्या विठ्ठलाची म्हणजे जगातल्या जिवांची सेवा होय. ग्रामगीतेतल्या 'जीवनकला' या अध्यायात 'जगा जगवा जीव जन' म्हणताना त्यांना हीच भक्ती (सेवा) अपेक्षित आहे, हे दिसून येते.

## 3) बुद्धिप्रामाण्य

'व्यक्तीचे प्रामाण्य (विभूतिपूजा), शब्द प्रामाण्य, ग्रंथप्रामाण्य, पूर्वसंकल्पना, अथवा प्रक्रियांचे प्रामाण्य यां पैकी काहीही न मानता केवळ बुद्धिप्रामाण्य मानणे हे विज्ञानाचे व्यवच्छेदक लक्षण ठरते.'

1956 मध्ये नाशिक येथे 500 ठळक अखाडेबाज साधूंच्या उपस्थितीत राष्ट्रसंत अध्यक्षीय भाषण देताना म्हणाले, 'आद्य शंकराचार्यजीने कहा था, वेद भी यदि कहेगा कि आग थंडी है, तो मै हरगिज न मानूँगा ।।' इसी दृष्टि से मैं अंधश्रद्धा का विरोधी हूँ और बुद्धिप्रामान्य का समर्थक हूँ । और इसी कारण आपकी मतभिन्नता का मैं आदर करता हूँ । ........ मै संत नही हूँ, सत्य का अंत पाना चाहता हूँ ।'' यामध्ये त्यांचे बुद्धिप्रामाण्य स्पष्टपणे दिसून येते. या ठिकाणी बुद्धाचा आदर्श जीवनात ठेवणे त्यांना महत्त्वाचे वाटते. 'आपल्या बुद्धीचे, चालचलनीचे, राहणीचे व अनुभवाचे भांडार स्वतंत्र बुद्धिने वाढविण्यासाठी शिक्षण हे ग्रंथ, हे आचार, हे विचार, हे सत्संग वगैरे करावयाचे असतात.' असे ते सांगतात.

आज समाजात बुवाबाजी मोठया प्रमाणात फोफावली आहे. जो तो चमत्काराच्या मागे धावताना दिसून येतो. अगदी नावासहित राष्ट्रसंत या भोंदूपणाच्या कथा ऐकवितात. येथे आमच्या बुद्धीस चालना देऊन आम्ही सत्यासत्य शोधावे हे त्यांना सांगायचे आहे. सर्पास खेळवणाऱ्यांचा मृत्यूही सर्पदंशानेच होतो. यात चमत्कार नसतो. चमत्काराने मानवाचे उत्थान झाले नाही. उलट या रंजल्या गांजल्यांना पुरुषार्थ शिकवणे आज गरजेचे आहे आणि म्हणूनच राष्ट्रसंत चमत्कारास नमस्कार न करण्याचे आवाहन त्यांच्या उभ्या आयुष्यात सातत्याने करीत आले आहेत. या व अशा खोट्या अवतारांना कंटाळूनच ते म्हणतात की, 'मला सरळ मनुष्य बनू द्या म्हणजे मी कृतार्थ होईन.'

वरील सर्व विवेचनाच्या आधारे त्यांच्या म्हणण्याचा विचार केला तर आपल्याला लक्षात येणारी महत्त्वाची गोष्ट म्हणजे आजच्या युवकाचा बुद्धि विकास होणे अत्यंत गरजेचे आहे. कारण जगाच्या पाठीवर आपले अस्तित्त्व सिद्ध करायचे असेल तर बुद्धिवादी बनणे गरजेचे आहे आणि म्हणून ते पुढे सांगतात.''मागील सर्व सिद्धांनी व सर्व साक्षात्कारी लोकांनी आजच्या जगात येऊन माझ्या देशातील सदतीस कोटी लोकांना 'माणूस' बनविण्याची व विश्वातील सर्व राष्ट्रांना माणुसकीने वागण्याची सद्‌बुद्धी द्यावी अशी मी त्यांना प्रार्थना करतो.'

## 4) आत्ममंथन व मर्यादांची जाणीव

सतत प्रयोग, विचारमंथन व सिद्धांतन या मार्गाने जाताना आत्ममंथन करीत राहून स्वतःच्या व स्वतःच्या प्रयोगाच्या मर्यादा जाणून त्या नमूद कराव्या लागतात. कोणत्याही क्षणी अंतीम सत्य किंवा 'त्रिकाल बाधित सत्य गवसले' असे विज्ञान मानू शकत नाही. त्या निसर्गचैतन्य शक्तीसमोर आपण काहीच नाही ही भावना आपल्या मनामध्ये सतत जागृत असली पाहिजे. यामुळे कोणतेही कार्य करीत असताना मनातला श्रेष्ठत्वाचा भाग

नाहीसा होत जाईल. आपण सर्वज्ञ, सर्वज्ञानी होणे म्हणजे फार मोठे होणे होय. पण जर असे न समजता आपण चित्तशुद्धी केली तर निश्चितच आपला फायदा झाल्याशिवाय राहाणार नाही. आणि म्हणूनच राष्ट्रसंत सांगतात, 'प्रभात काळी उठणे, आपल्या स्थानाची शुद्धी करणे, आपल्या सर्व इंद्रियांना सात्त्विक वळण लावणारे संकल्प करणे, समाजाशी समरस करणारा किंवा सामंजस्य कायम ठेवणारा सर्व व्यवहार करीत राहून मानवजातीची सेवा घडेल अशाप्रकारे आचार विचार ठेवणे, कुणालाही आपल्याविषयी चिंता किंवा उद्वेग वाटणार नाही अशा नियमांनी वागणे यालाच मी उत्तम साधना समजतो' यातून आत्ममंथन काय ते आपल्या लक्षात येईल.

हे आत्ममंथन आपण कसे करावे हा प्रश्न मनामध्ये निर्माण होणे साहजिक आहे. याचे उत्तर राष्ट्रसंत देतात. ते सांगतात की प्रार्थनेने आत्ममंथन होत असते. जो प्रार्थना करतो तो आत्मनियमन करील व त्याला आपल्या मर्यादांची जाणीव असल्याने तो स्वविकास साधण्याचा आटोकाट प्रयत्न केल्याशिवाय राहाणार नाही. प्रार्थना ही नुसती उच्चार–विचाराची गोष्ट नसून आचरणाचे तत्त्व आहे. बाह्यांगाची ताकद व समाधानाची शक्ती प्रार्थनेमुळे वाढत असते. आपण त्याच माध्यमातून स्वविकास साधण्याचा सातत्याने प्रयत्न केला पाहिजे.

पुढें राष्ट्रसंत सांगतात की, अभ्यासू माणसाने यमनियमादि साधना जरी केली तरी त्याला आत्मानुभवाची प्राप्ती होत नाही. थोडक्यात यमनियमादि साधने वाईट नाहीत, पण ती योग्य मार्गाने करण्याची क्षमता आमच्यात असणे गरजेचे आहे. जोपर्यंत आपण याचा अर्थ समजून घेत नाही तोपर्यंत योग्य आत्ममंथन होत नाही. आपल्या मर्यादेची जाणीव आपल्याला झाल्याशिवाय राहाणार नाही.

राष्ट्रसंत देवदेवतांनाही मर्यादा होती हे ठणकावून सांगतात. त्यांच्या म्हणण्याप्रमाणे आपण जर प्रगती, विकास करायचा ठरवले तर दिनचर्या, व्यवहार–शुद्धी, समाजसेवा या 3 पायऱ्या चढूनच पुढे जावे लागेल.

## अखंड परिवर्तनशीलता

ज्ञात–अज्ञातादरम्यानची सीमारेषा सतत बदलत राहाते व अज्ञाताचा अधिकाधिक प्रांत ज्ञानाच्या अवाक्यात प्रयोगशीलतेमुळे येत राहातो.

'मनुष्य व मनुष्याची साधने ही संसारचक्राप्रमाणे, साहित्याप्रमाणे, बुद्धीच्या विकासाप्रमाणे बदलली गेली पाहिजेत. ही वृत्ती ज्या राष्ट्रात जिवंत राहते तेच राष्ट्र अखंडत्वाने चमकणारे असते.'

परिवर्तन हा सृष्टीचा नियम आहे व परिवर्तनात विकास आहे. या वैज्ञानिक भूमिकेतून राष्ट्रसंत वरील सिद्धांत सांगतात. आज सामाजिक, राजकीय परिस्थिती, कर्तव्यकर्म, कार्यप्रणाली, कार्यपद्धती, नियमन पद्धती बदलत आहेत. आपण आपल्यात परिवर्तन जर केले नाही तर आपल्यावर चुकीचे कार्य करण्याचा ठपका येईल. आपण जर एखादी गोष्ट चांगली करायची ठरवत असू तर आपल्यात काळानुरूप इष्ट परिवर्तन आणणे सर्वप्रथम महत्त्वाचे ठरते.

देशाचा विकास साधण्याकरिता प्रचंड आकाराची यंत्रसामुग्री व साधनसामुग्री मालकीची असावी. जेणेकरून प्रत्येकाच्या मनात देश व कार्याबाबत आपुलकी निर्माण होईल.

आपल्याला काही सवयी जडलेल्या असतात, त्या लवकर दूर होत नाही. विद्यार्थ्यांमध्ये पालक, शिक्षक बदल घडवून आणू शकतात. मात्र त्यासाठी कायदा उपयोगी नसतो. कायदा धाक दाखवील पण त्यापलिकडे जाऊन जीवनात काही करायचे तर आपल्याला स्वतःतच परिवर्तन घडवून आणावे लागेल. मगच मुलेही बदलतील.

जगाचा नियमच क्रांतीचा आहे. राष्ट्रसंत म्हणतात, 'जग हे क्रांतिशील आहे. जगात अशी कोणतीच वस्तू नाही, की ज्यात क्रांती होत नाही. अगदी शेतीचा विचार केला तर शेतीतही उत्क्रांती आहे हे जाणवेल. जगाच्या आंदोलनात जगाचा मध्यबिंदूही स्थिर राहात नाही. तो सुद्धा परत स्थापित करावा लागतो.' अगदी तसेच आपल्या जीवनामध्ये सातत्याने परिवर्तन घडते. व्यक्ती भोगी असेल तर त्याला समाजधारणेच्या सिद्धान्तानुसार त्यागी बनवावेच लागेल.

थोडक्यात, आपल्याजवळ जेव्हा सम्यक्‌दृष्टी म्हणजेच समतोल दृष्टी येईल तेव्हा हे परिवर्तन दीर्घकाळ टिकल्याचा भास होईल, कारण भासात सतत परिवर्तन सुरू असल्याचे दृष्टीस येईल. पण जर असे झाले नाही तर जनता आपणास कधीच माफ करणार नाही, हे सुद्धा आपण लक्षात ठेवले पाहिजे. थोडक्यात सांगायचे तर शंकराचार्य म्हणतात, 'ब्रम्ह सत्य जगन्मिथ्या' हा वस्तुप्रभा सिद्धांत किंवा मायावाद होय. विश्व हे ब्रम्हाची छाया म्हणजेच माया–असा याचा अर्थ आहे. राष्ट्रसंत म्हणतात,'विश्व हेच ब्रम्ह आहे' दोहोंत एकरूपता जाणवते, एकाचा दुसऱ्यावर आरोप किंवा अध्यास करण्याचेही काही कारण नाही'.

राष्ट्रसंतांचा हा विश्वसत्यवाद गौतम बुद्धाच्या,'सब्बं खनिकम्, सब्बम् दुःखम्' या अनित्यतावाद किंवा परिवर्तनवाद यांच्याशी मेळ खाऊन विज्ञानवाद झाला आहे.

## निष्कर्ष

1) राष्ट्रसंतांचा दृष्टिकोण इहवादी व परिवर्तनवादी असल्यामुळे तो विज्ञाननिष्ठ आहे.
2) विज्ञानाचा पुरस्कार भारतीय संतांनी व पुरोगामी विचारवंतांनी जीवनाशी निगडीत स्वरूपात केलेला आहे.
3) राष्ट्रसंतांची विज्ञानदृष्टी जनसापेक्ष आहे. परिणामी राष्ट्सतांचा विचार व उच्चार हा आचारात परिणत होतो.
4) इहवाद हे विज्ञानदृष्टीचे पहिले लक्षण आहे.
5) भारतीय समाजजीवन हे रूढी परंपरांवर आधारित कर्मकांडामुळेच विपन्न झालेले आहे.
6) आज आपण सत्याचा शोध घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. अर्थात विज्ञानदृष्टीतून जीवनात परिवर्तन घडवून आणले पाहिजे. त्याशिवाय एतद्देशीय प्राचीन ऋषीमुनींच्या विचार पद्धतीसह विकासाचे मार्ग खुले होणार नाहीत.
7) विज्ञान जीवनशैलीत लपले आहे, गरज आहे ती फक्त त्याचा योग्य मार्गाने शोध घेण्याची.
8) राष्ट्रसंतांना रूढी, परंपरेचे, वैचारिकतेचे दास्य अमान्य होते.
9) राष्ट्रसंत हे बुद्धीप्रामाण्याचे व विवेकवादाचे खंदे समर्थक होते.
10) राष्ट्रसंत समाजातील अनिष्ट प्रथा–परंपराचे समथपणे खंडन करताना दिसतात.
11) स्वार्थनिरपेक्ष कर्तव्यनिष्ठेतून व सेवाकार्यातून जीव व जन विकास साध्य होईल यावर त्यांचा दृढ विश्वास होता.
12) आज युवकांच्या बुद्धीचा विकास एकांगी पद्धतीने होत चालला असून त्यास विविध अंगांनी विकसित होणे गरजेचे आहे.
13) निसर्गचैतन्यशक्ती अनादि अनंत असून ती सर्वात बलवान शक्ती आहे.
14) चित्तशुद्धीतून आपण निसर्गचैतन्य शक्तीवर विजय प्राप्त करू शकतो.
15) सामूहिक किंवा सामुदायिक प्रार्थनेमधून आत्ममंथन करणे शक्य होते. आत्ममंथनातून आत्मशक्तीचे पोषण होते व नियोजित आदर्शांच्या दिशेने एकात्म विकास साधला जातो.
16) अखंड परिवर्तनशीलता हा सृष्टीचा नियम असल्याचे भ. बुद्धाप्रमाणे राष्ट्रसंत ठामपणे नमूद करताना दिसतात.
17) राष्ट्रसंत लोकविज्ञानाचा खोलवर विचार करून त्याचा संबंध समस्त जनसामान्यांच्या जीवनसमृद्धीशी जोडतात.
18) राष्ट्रसंतांची विज्ञानदृष्टी ही अध्यात्मनिष्ठ आहे. शिवाय ती केवळ सिद्धांतन करीत नाही तर स्वार्थनिरपेक्ष विवेकानिशी कर्तव्यबुद्धीने सेवाधर्माचा अवलंब करते व विश्वाच्या वास्तवरूपात इष्ट परिवर्तन घडवून आणण्याचा प्रयत्न करते.

## समारोप

विज्ञान म्हणजे 'विश्वाबद्दलचे ज्ञान किंवा केवळ संशोधन आणि त्यातून लागलेले शोध' एवढाच मर्यादित अर्थ नाही, तर विज्ञान हा जगातील विविध मानवसमूहांना जोडणारा सेतू आहे. कल्याणकारी राज्याचे महत्त्वाचे सूत्र आहे जनहित. आणि जनहिताच्या साधनांची निर्मिती करणे हे विज्ञानाचे कार्य किंवा हेतू आहे.
राष्ट्रसंतांची विज्ञानदृष्टी ही संतांची विज्ञानदृष्टी आहे, क्रांतिकारी समाजसुधारकाची परखड, कोरडी, रुक्ष अशी जीवनदृष्टी नाही. त्यामुळे सर्वात आत्मत्व पाहाणे व सर्वभूती प्रेम हा त्यांच्या हृदयाचा स्थायीभाव विसरता येत नाही. सुधारणा करतानाही जनमानस दुखावला जाऊ नये म्हणूनच ते टोकाची भूमिका न घेता बुद्धासारखा मध्यममार्ग अवलंबतात. अस्पृश्य मंदीर प्रवेशाचे संदर्भात हे प्रखरपणे जाणवते. उदा. गांधींनी 'मंदिरात जेव्हा अस्पृश्य जातील तेव्हाच मी सुद्धा जाईन' ही भूमिका एकदा राष्ट्रसंतांसमक्ष घेतली होती. राष्ट्रसंत वरखेडच्या प्रार्थना मंदिरात हीच भूमिका घेतात. तर पंढरपूरच्या विठोबा मंदिरातही पायरीला नमस्कार करूनच परत येतात. त्यांनी फक्त विदर्भातच नाही तर उत्तरप्रदेश, मध्यप्रदेशात जाऊन अस्पृश्यता निर्मूलनाचे कार्य केले. 1 मे 1947 ते 10 मे 1947 रोजी सानेगुरुजी विठ्ठल मंदिर हरिजनांस मुक्त करा म्हणून उपोषणास बसले असता त्यांच्या उपोषणाच्या समर्थनार्थ 5 लाख सह्यांचे निवेदन मुख्यमंत्री बाळासाहेब खेर यांना देत राष्ट्रसंतांनी साने गुरुजींना विजय मिळवून दिला. हे कार्य खऱ्या अर्थाने विज्ञानवादी दृष्टिकोणाचे कार्य ठरते.

विज्ञान म्हणजे जनमानसात वसणारे जीवनमुल्य, जीवनपद्धती हे त्यांनी समर्थपणे पटवून दिले. राष्ट्रसंत बुद्धीचा पुरस्कार करतात. 'ज्या बुद्धीला स्वतंत्रता नाही ती बुद्धी जिवंत मानव्याची द्योतक नसून केवळ मेंढराप्रमाणे असते.' असे ते स्पष्टपणे सांगतात.

## 'संदर्भग्रंथ'


डॉ. पारसनीस अरविंद,'अंतर्नाद' मासिक आक्टोबर 2006

डॉ. सावरकर सुभाष, 'जनक्रांतीची दिशा, ग्रामगीता रहस्य स्पंद–3' प्रका.मराठी जनसाहित्य परिषद अमरावती आक्टोबर 2006.

सावरकर सुदाम, 'जीवनयोगी' खंड 6 पृष्ठ 71

कडवे रघुनाथ,'राष्ट्रसंत समग्र गद्य वाङ्मय' खंड 7 श्री गुरुदेव प्रकाशन पृष्ठ क्र.8

कडवे रघुनाथ, 'राष्ट्रसंत समग्र गद्य वाङ्मय' खंड 9 श्री गुरुदेव प्रकाशन पृष्ठ क्र.47

कडवे रघुनाथ, 'राष्ट्रसंत समग्र गद्य वाङ्मय' खंड 9 श्री गुरुदेव प्रकाशन पृष्ठ क्र.48

कडवे रघुनाथ, 'राष्ट्रसंत समग्र गद्य वाङ्मय' खंड 9 श्री गुरुदेव प्रकाशन पृष्ठ क्र.48

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, 'लहर की बरखा भाग 2' राष्ट्रसंत समग्र वाङ्मय 'गुरुकुंज मोझरी.

कडवे रघुनाथ, 'राष्ट्रसंत समग्र गद्य वाङ्मय खंड 8 श्री गुरुदेव प्रकाशन पृष्ठ क्र.40

राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, 'मेरी जीवनयात्रा' राष्ट्रसंत समग्र वाङ्मय गुरुकुंज मोझरी.

कडवे रघुनाथ, 'राष्ट्रसंत समग्र गद्य वाङ्मय' खंड 9 श्री गुरुदेव प्रकाशन पृष्ठ क्र. 9

कडवे रघुनाथ, 'राष्ट्रसंत समग्र गद्य वाङ्मय' खंड 8 श्री गुरुदेव प्रकाशन पृष्ठ क्र.53

कडवे रघुनाथ, 'राष्ट्रसंत समग्र गद्य वाङ्मय' खंड 8 श्री गुरुदेव प्रकाशन पृष्ठ क्र.58

कडवे रघुनाथ, 'राष्ट्रसंत समग्र गद्य वाङ्मय' खंड 8 श्री गुरुदेव प्रकाशन पृष्ठ क्र.58

कडवे रघुनाथ, 'राष्ट्रसंत समग्र गद्य वाङ्मय' खंड 8 श्री गुरुदेव प्रकाशन पृष्ठ क्र.11

कडवे रघुनाथ, 'राष्ट्रसंत समग्र गद्य वाङ्मय' खंड 2 श्री गुरुदेव प्रकाशन पृष्ठ क्र.50

कडवे रघुनाथ, 'राष्ट्रसंत समग्र गद्य वाङ्मय' खंड 1 श्री गुरुदेव प्रकाशन पृष्ठ क्र.74